आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२९ नोव्हेंबर २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सोमवारपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर उद्या सर्वपक्षीय बैठक

- केवळ सव्वा ३ लाख शेतकऱ्यांनी घेतला रब्बी हंगामासाठी पीक वीमा

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मन की बातमधून देशवासियांशी संवाद साधणार

**आणि**

- भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेला उद्यापासून प्रारंभ

**<><><><><>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन सोमवारपासून सुरु होत आहे. त्या पार्श्वभूमीवर सरकारनं उद्या सर्वपक्षीय बैठक बोलवली आहे. लोकसभा आणि राज्यसभेतल्या सर्व पक्षांच्या नेत्यांशी संसदीय कार्य मंत्री किरेन रीजिजू चर्चा करणार आहेत. अधिवेशनाचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सरकार सर्व पक्षाच्या सदस्यांना विनंती करेल, असं रिजीजू यांनी सांगितलं. हे अधिवेशन १९ डिसेंबरपर्यंत चालणार आहे.

**<><><><><>**

विकसित भारताचं ध्येय साध्य करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकानं एकसमान योगदान देण्याची गरज संरक्षणंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केली आहे. उत्तराखंडमधल्या मसुरी इथल्या लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमीच्या १०० व्या फाऊंडेशन कोर्सच्या समारोप समारंभाला आज त्यांनी संबोधित केलं. भारताची आजची विकासाची गती कायम राखण्यासाठी, देशातला युवा वर्गही तितकाच उत्साही असणं महत्वाचं आहे असं ते म्हणाले. २०४७ मध्ये देश जेव्हा विकसित झालेला असेल, त्यावेळी देशातल्या अनेक महिला कॅबिनेट सचिव पदापर्यंत पोहोचलेल्या असतील. देशाच्या विकासात योगदान देण्यासाठी भारताची महिला शक्ती सज्ज आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची भेट घेतली. या भेटीत बिहारमधील राजकीय परिस्थिती, आणि तिथे नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीतील पक्षाच्या कामगिरीबाबत चर्चा झाल्याचं वृत्त आहे. या भेटीच्या वेळी पक्षाचे बिहारचे पक्ष प्रभारी कृष्णा अल्लावारू आणि बिहारमधील पक्षाचे अनेक नेतेही उपस्थित असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**<><><><><>**

कर्नाटकात नेतृत्वबदलाच्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांची आज बंगळुरूत मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी बैठक झाली. आगामी विधानसभा निवडणुका एकत्रित लढणार असल्याचं दोघांनीही बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. येत्या ८ तारखेपासून होणाऱ्या हिवाळी अधिवेशनादरम्यान विरोधकांना सामोरं जाण्याच्या रणनितीबाबत तसंच आगामी निवडणुकांबाबत या बैठकीत चर्चा झाली. आमच्यात कोणतेही वाद नाहीत, काँग्रेस हायकमांडच्या सूचनांनुसार एकत्रित काम करत राहू, अशी माहिती मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी दिली. कर्नाटकमध्ये सत्ता स्थापून अडीच वर्षं झाल्यानं नेतृत्वबदलाच्या चर्चा होत होत्या.

**<><><><><>**

रब्बी हंगामातील पीक विम्यासाठी आत्तापर्यंत केवळ ३ लाख २६ हजार १६८ शेतकऱ्यांनी २ लाख ६ हजार ९९५ हेक्टर क्षेत्राचा विमा उतरवला आहे. गेल्या वर्षी सुमारे ५५ लाख शेतकऱ्यांनी हा विमा उतरवला होता. राज्यातील विमा उतरवलेल्या क्षेत्राची एकंदर विमा रक्कम ८२० कोटी रुपये आहे. कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार परभणी जिल्ह्यात सर्वाधिक ५० हजार ४६२ शेतकऱ्यांनी ३३ हजार १२ हेक्टरवरील क्षेत्राचा विमा उतरवला आहे. त्यापाठोपाठ बीड आणि लातूर जिल्ह्याचा क्रमांक आहे. शेवटच्या काही दिवसात मोठ्या प्रमाणात अर्ज येतात. त्यामुळं तांत्रिक समस्या निर्माण होऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी मुदत संपण्यापूर्वीच पीक विमा उतरवण्याचं आवाहन पुणे  कृषी विभागानं केलं आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं ८० कोटी डॉलर्सच्या कर्जासाठी आशियाई विकास बँकेसोबत करार केला आहे. महाराष्ट्रातल्या कृषी सौर पंपांसाठी ५० कोटी डॉलर, इंदूर मेट्रोसाठी १९ कोटी डॉलर आणि गुजरामधल्या कौशल्य विकास कार्यक्रमासाठीच्या ११ कोटी डॉलरच्या कर्जाचा यात समावेश आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या रविवारी सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा १२८वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, वेबसाइट तसंच न्यूजऑनएयर मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल.

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेला उद्यापासून प्रारंभ होत आहे. तीन सामन्यांच्या या मालिकेतला पहिला सामना उद्या रांची इथं दुपारी दीड वाजता सुरू होईल.  दुसरा सामना तीन डिसेंबरला रायपूर इथं तर तिसरा सामना सहा डिसेंबरला विशाखापट्टणम् इथं खेळवला जाणार आहे. या मालिकेपाठोपाठ दोन्ही संघात पाच टी ट्वेंटी सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. मालिकेतला पहिला सामना नऊ डिसेंबरला कटक इथं होणार आहे.

क्रिकेट सामन्याच्या तिकीटांचा काळाबाजार करणाऱ्या तीन जणांना रांची पोलिसांनी अटक केली. रांची इथं होत असलेल्या भारत-दक्षिण आफ्रिका आंतरराष्ट्रीय एकदिवसीय किकेट सामन्याच्या एक दिवस आधी ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या त्रिकुटाकडून बाराशे, सोळाशे आणि सतराशे रुपयांची १३ तिकिटं जप्त केली. झारखंड स्टेट क्रिकेट असोसिएशन आंतरराष्ट्रीय मैदानावर उद्या हा सामना होत आहे.

**<><><><><>**

भारताचा हॉकी संघ सुलतान अजलनशाह चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे. इपोह इथं झालेल्या उपान्त्य सामन्यात भारतानं कॅनडावर १४ विरुद्ध ३ अशा गोलफरकाने दणदणीत विजय मिळवला. जुगराज सिंगने ४ गोल केले.

दुसरा उपान्त्य सामना बेल्जियम आणि न्यूझीलंडमधे होणार आहे. मात्र बेल्जियम गुणतालिकेत १० गुण मिळवून अव्वल स्थानी आहे. न्यूझीलंडला अंतिम फेरीत पोहोचायचं असेल तर त्यांना उपान्त्य सामना किमान ६ गोलफरकाने जिंकावा लागेल.

<><><><>

दितवाह चक्रीवादळ बंगाल उपसागराच्या नैऋत्येकडून तामिळनाडूच्या किनाऱ्याकडे सरकत असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. येत्या २४ तासांत हे वादळ उत्तर दिशेकडे सरकून, आज मध्यरात्रीपर्यंत तामिळनाडूच्या किनारपट्टीपासून २५ किलोमीटर अंतरापर्यंत येईल, असा अंदाजही हवामान विभागनं वर्तवला आहेत. या पार्श्वभूमीवर नागपट्टिनम आणि काराईकल बंदरांवर पाच क्रमांकाचा धोक्याचा इशारा दिला गेला आहे. तर चेन्नई, कुड्डालोर, एन्नोर, कट्टुपल्ली, पुद्दुचेरी, पंबन आणि तूतीकुडी इथं चार क्रमांकाचा इशारा दिला गेला आहे.

राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानंही खबरदारीच्या उपाययोजना हाती घेतल्या असून, सखल भागात राहत असलेल्या लोकांना तात्काळ सुरक्षित स्थळी जावं अशा सूचना एसएमएसद्वारे जारी केल्या गेल्या आहेत.

दितवाह चक्रीवादळाच्या प्रभावानं पुद्दुचेरी आणि काराईकल किनारपट्टीलगतचा समुद्रही खवळलेल्या स्थितीत असून, या क्षेत्रात जोरदार पाऊस सुरूच आहे. नल्लवाडू इथं १० फुटांपेक्षा जास्त उंचीच्या लाटा उसळत असल्यानं किनारपट्टीची धूप होऊ लागली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून, मच्छिमारांनी ५०० पेक्षा जास्त बोटी किनारपट्टीपासून दूर हलवल्या आहेत आणखी जोरदार पावसाचा अंदाज असल्याने सर्व विभागांना अतिदक्षतेचा इशारा देण्यात आला आहे.

<><><><>

पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहीमेअंतर्गत आत्तापर्यंत अंदाजे साडेपंधरा लाखापेक्षा जास्त मतदार यादीत नाव असलेल्या, पण प्रत्यक्षात मृत पावलेल्या नोंदीची निश्चिती झाली असल्याचं भारत निवडणूक आयोगानं कळवलं आहे. यासोबतच राज्यभरात साडेसात लाखापेक्षा जास्त मदतारांना विशेष पुनरीक्षण विषयक अर्ज दिले असून, त्यापैकी ६ लाख ४५ हजार मतदारांच्या अर्जांचं डिजिटायजेशन पूर्ण झालं असल्याचंही आयोगानं कळवलं आहे.

या मोहीमेअंतर्गत कार्यरत असलेल्या राज्यातल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करावी असे निर्देश भारत निवडणूक आयोगानं पश्चिम बंगालच्या पोलीस महासंचालकांना दिले आहेत. तृणमूल काँग्रेस या मोहीमेला सहकार्य करत नसल्याचा आरोपही आयोगानं केला आहे.

दरम्यान, विशेष सखोल पुनरीक्षण मोहीमेच्या सध्याच्या १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधील दुसऱ्या टप्प्याअंतर्गत ५० कोटी ४३ लाखापेक्षा जास्त मतदारांना विशेष पुनरीक्षण विषयक अर्ज दिले असून, त्यापैकी ४० कोटी अर्जांचं डिजीटायझेशन झाल्याची माहितीही निवडणूक आयोगानं दिली आहे. ही मोहीम पूर्ण झाल्यावर संबंधित राज्यं आणि केंद्रशासीत प्रदेशांमधल्या अंतिम मतदार याद्या पुढच्या वर्षी ७ फेब्रुवारीला प्रकाशित केली जाणार आहे.

**<><><><><>**

रशियाने युक्रेनवर काल रात्री केलेल्या ड्रोन हल्ल्यात तीन  जणांचा मृत्यू झाला असून २९ जण जखमी झाले आहेत. सतत होणाऱ्या हल्ल्यांमुळे सध्या कीव शहरात ६ लाख लोक विजेविना राहत असल्याचं तिथले महापौर विताली क्लिश्को यांनी सांगितलं. तर युक्रेनचे शंभरहून अधिक ड्रोन हाणून पाडल्याचा दावा रशियाने केला आहे.

**//<><><><><>//**